अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक : अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. २७ मार्च २०२५ | वर्ष १० वे | अंक ३३ वा | ब्रम्हपुरी | पाने ६ | किंमत २ रूपये

# गो-तस्कराविरोधात गुन्हा नोंदविण्याचे आय.जी.चे आदेश

## बातमी संकलनाकरीता गेलेल्या पत्रकाराला जीवे मारण्याची धमकी देण्याचे प्रकरण

ब्रम्हपुरी/का.प्र.

नागभीड येथील गो-वंश तस्करांनी स्थानीय पत्रकाराला जीवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी पोलिस उपमहानिरिक्षक यांनी स्थानीय पोलिसांना गो-तस्कराविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहे. पत्रकारांच्या शिष्टमंडळाने पोलिस उपमहानिरीक्षक (D.I.G.) यांची प्रत्यक्ष भेट घेवून गो-तस्कराविरूद्ध कारवाई करण्याची मागणी केली होती.

१९ मार्चला रात्री ८च्या सुमारास बजरंग दल स्वयंसेवकांनी कृषी उत्पन्न बाजार सामितीसमोर व ने.हि. महाविद्यालयाजवळ गो वंशाची अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्या ट्रक्सला अडविले. बजरंग दलाचे कार्यकर्ता देवराव नवघरे यांनी आपल्या सहकाऱ्यासोबत घटनास्थळावर जाऊन वाहन चालकास जाब विचारला असता, त्यांनी समाधनकारक उत्तर दिले नाही. सदर घटनेची माहिती स्थानिय पत्रकार राहूल भोयर हे वृत्तसंकलनाकरीता घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी मोबाईल फोनने घटना कैद केली. यावरून गो तस्कर व पत्रकारादरम्यान वाद निर्माण झाला. वाहनचालकांनी पत्रकाराचा मोबाईल हिसकला व जमिनीवर आदळला. एवढेच नव्हे तर एकाने तर पत्रकाराला जीवे मारण्याची धमकी दिली. ही घटना म्हणजे लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर आक्रमण म्हणावे लागेल.

या प्रकरणी राहूल भोयर या पत्रकाराने १९ मार्चच्या रात्रीला गोवंश तस्करा विरोधात जीवे मारण्याची धमकी देण्याची तक्रार दिली असता, ती स्वीकारण्यात आली नाही. नंतर दुसऱ्या दिवशी राहूल भोयर यांनी पत्रकारांसोबत पोलिस निरिक्षक प्रमोद बानबले यांची भेट घेतल्यानंतर तक्रार दाखल करण्यात आली. परंतु गो तस्करा विरोधात गुन्हा नोंदविण्यात आला नाही. दरम्यान पोलिस उपमहानिरीक्षक सोमवारला पोलिस ठाण्याला येत असल्याची माहिती मिळताच पत्रकारांच्या शिष्टमंडळाने त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन पत्रकाराला जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी गुन्हेगारा विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. यावर पोलिस उपमहानिरीक्षकांनी दोषी व्यक्तीविरोधात गुन्हा नोंदविण्याचे निर्देश स्थानीय पोलिसांना दिले. निवेदन देतांना तक्रारदार राहूल भोयर, प्रशांत डांगे, जीवन बागडे, दत्ता दलाल, महेश पिलारे, रवी चामलवार, क्रिष्णा वैद्य, रूपेश देशमुख व नंदू गुड्डेवार आदी पत्रकार उपस्थित होते.

**वाचाल तर वाचाल..**

# इतर राज्यांपेक्षा महाराष्ट्रात तिप्पट दराने HSRP नंबर प्लेटचे कंत्राट

## वाहनधारकांची पिळवणूक

ब्रम्हपुरी/का.प्र.

राज्यातील मंत्रीमंडळ अस्तित्वात येण्यापूर्वीच परिवहन विभागातील अधिकाऱ्यांनी तीन कंपन्याचा एच.एस.आर.पी. नंबर प्लेट लावण्याचे बेकायदा कंत्राट दिले आहे. कंपन्यांना लाभ होईल, अशा पद्धतीने काही जाचक अटी अधिकाऱ्यांनी टाकल्या. त्याचा फटका सामान्य वाहनधारकांना बसणार आहे. महाराष्ट्रात एच.एस.आर.पी नंबर प्लेट लावण्यासाठी दुचाकी मालकाला ४५० रूपये द्यावे लागणार आहेत. गुजरात राज्यामध्ये याच कामासाठी वाहनधारकाला फक्त १६० रूपये द्यावे लागतात. या संदर्भात मुख्यमंत्री फडणवीस आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे तक्रार करण्यात आली आहे. त्यात म्हटले आहे की, या कामाची किंमत ६०० कोटी दाखविण्यात आली आहे. राज्यातील ०२ कोटी १० वाहनांना आरटीओ च्या दरानुसार नंबर प्लेट लावण्यास सुरूवात केल्यास या तीन कंपन्यांना १५०० कोटी रूपये मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे या कंत्राटाची चौकशी करावी. आरटीओची जाचक एसओपी तात्काळ रद्द करावी, अशी मागणी व तक्रार करण्यात आली.

वाहतूक गुन्हे किंवा इतर स्वरूपाचे गुन्हे केल्यानंतर पोलिसांपासून पळ काढण्यासाठी वाहन क्रमांकाच्या प्लेटमध्ये बदल केला जातो. नंबर प्लेट बदलल्यामुळे अनेकदा वाहने आणि दोषी सापडत नाहीत. गुन्ह्याची उकल करणे, वाहन अपघात झाल्यानंतर वाहनधारकांची संपूर्ण माहिती उपलब्ध करतांना येणाऱ्या समस्या दूर करण्यासाठी वाहनांना हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बंधनकारक आहे. ०१ एप्रिल २०१९ पासून उत्पादित होणाऱ्या नविन वाहनांना केंद्रिय रस्ते वाहतूक मंत्रालयाने नव्या स्वरूपातील नंबर प्लेट बंधनकारक केल्या होत्या. तसे आदेश २०१८ मध्येच देऊन वाहनांना एचएसआरपी बंधनकारक करण्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार राज्य सरकारला दिला होता. या अधिकारांतर्गत दिल्लीसह अनेक राज्यांमध्ये एचएसआरपी बंधनकारक केले. मात्र महाराष्ट्र राज्यात २०१९ पूर्वीच्या जून्या वाहनांना नवीन नंबरप्लेट बंधनकारक केली नव्हती. मात्र, डिसेंबर महिन्याच्या शेवटी परिवहन विभागाने राज्यातील २०१९ पूर्वीच्या जून्या वाहनांना ३० जूनपर्यंत हाय सेक्यूरिटी नंबर प्लेट लावून घेणे बंधनकारक केले आहे.

**विविध राज्यांमधील वाहनांवरील नंबर प्लेटचे दर**

| राज्य | दुचाकी | तीनचाकी | एलएमव्ही | व्याव. वाहन |
|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र | ४५० | ५०० | ७४५ | ७४५ |
| आंध्रप्रदेश | २४५ | २८२ | ६१९ | ६४९ |
| गोवा | १५५ | १५५ | २०३ | २३२ |
| गुजरात | १६० | २०० | ४६० | ४८० |
| छत्तीसगड | ३६५.८ | ४२७.१६ | ६५६.८ | ७०५.६४ |
| राजस्थान | ३६०.१७ | ३९८.३ | ५८८.९८ | ६१८.६४ |
| झारखंड | ३०० | ३४० | ५४० | ५७० |
| पंजाब | २००.६ | २७०.२२ | ५९४.७२ | ६३४.८४ |

### उच्चस्तरीय समितीने दिली आहे मान्यता -

सर्वात कमी दराच्या कंपन्यांनाच कंत्राट दिला आहे. इतर राज्याच्या दराच्या तुलनेत आपले कमी दर आहे. उच्चस्तरीय समितीनेच या दराला मान्यता दिली आहे. - विवेक भिमनवार

(उर्वरित पान क्र. ६ वर)



## संपादकीय...

# सुरक्षेची हमी कुणाची ?

भारतीय संविधानानुसार, प्रत्येक सामान्य नागरिकाची सुरक्षा सुनिश्चित करणे तसेच देशात कायदा आणि सुव्यवस्था राखणे ही सरकारची जबाबदारी आहे. परंतु जेव्हा सरकार सुरक्षा देण्याच्या नावाखाली सामान्य नागरिकाला बिले देऊ लागते तेव्हा काय करावे? त्यातही तो नागरिक नियमितपणे त्याचा उत्पन्न कर भरत असेल तर काय? असे म्हटले जाते की सरकार करदात्यांनी भरलेल्या करांवर चालते. अलीकडेच जयपूरमध्ये अशीच एक घटना उघडकीस आली. एका गुंडाने एका व्यावसायिकाकडून दोन कोटी रुपयांची खंडणी मागितल्याने त्याने पोलिसांकडे संरक्षणाची मागणी केली. व्यावसायिकाला देण्यात आलेल्या सुरक्षेच्या बदल्यात पोलिसांनी त्याला ७६ लाख रुपयांचे बिल दिले. बिल आकारले जाईल याची व्यावसायिकाला कल्पनां देण्यात आली नव्हती. त्यामुळे आता करदात्यांनाही त्यांच्या मूलभूत हक्कांसाठीही बिल भरावे लागते का, असा मुद्दा उपस्थित झाला आहे, याचे उत्तर होकारार्थी असेल तर शेवटी, देशात करदात्यांना सुरक्षेचा हक्क आहे का नाही, हा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो. प्रत्येक करदात्याने आपला कर प्रामाणिकपणे जमा करावा, अशी सरकारची अपेक्षा असते, ते योग्यही आहे. मग त्या बदल्यात सरकारकडून काही मूलभूत सुविधांची अपेक्षा करदाते करणार नाही का?

भारत जगातील सर्वात मोठी पाचवी अर्थव्यवस्था बनला आहे आणि लवकरच आपण तिसऱ्या क्रमांकावर पोहोचणार आहोत. देशातील करदात्यांनी आणि देशात पैसे गुंतवणाऱ्या गुंतवणूकदारांनी सरकारला हे बळ दिले आहे आणि त्यांची संख्या वाढवण्यासाठी सरकार मेहनत घेत आहे. कायदा आणि सुव्यवस्था उत्तम असेल तरच व्यापारी आणि गुंतवणूकदार सुरक्षित असतात, गुन्हेगारीमुळे अथवा कायदा आणि सुव्यवस्था राखण्यात सरकार तोकडे पडले आणि व्यापार उदिमाचे नुकसान झाले, तर मात्र त्याला सरकार उत्तरदायी नसते, हे चुकीचे आहे, अशी बिले भरणे हे सुरक्षेसाठी सरकारला खंडणी देण्यासारखेच आहे. सरकार कर भरण्याबाबत सतत मोहीम चालवते आणि कर चुकवणाऱ्यांना गुन्हेगारी श्रेणीत टाकले जाते. त्याचवेळी करदात्यांच्या संरक्षणाला अत्यंत महत्त्व आहे, कारण ते केवळ त्यांच्या वैयक्तिक हक्कांचे रक्षण करत नाही तर एकूण करप्रणालीची विश्वासार्हता आणि पारदर्शकताही सुनिश्चित करते. करदात्यांना धमक्या येत असतील, तर त्याने सुरक्षेची किंमत मोजायला तयार असायला हवे का? सरकारने करदात्यांच्या उत्पन्नाचे संरक्षण करणे महत्वाचे आहे, कारण सरकार केवळ त्यांच्या वैयक्तिक उत्पन्नाचे संरक्षण करत नाही तर व्यवस्थेत विश्वासार्हता आणि आर्थिक पारदर्शकताही आणते. जर एखाद्या करदात्याला असे वाटत असेल की आयकर विभागाकडून त्याचा अन्याय, छळ होत आहे, तर त्याच्याकडे तक्रार निवारण यंत्रणेचा सक्षम पर्याय असला पाहिजे. सरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना करदात्यांच्याच पैशातून पगार आणि इतर सुविधा मिळतात. म्हणूनच अधिकाऱ्यांनी जनहितासाठी काम केले पाहिजे. प्रत्येक नागरिकाला सुरक्षा प्रदान करणे ही पोलिसांची जबाबदारी आहे. सरकार पोलीस खात्यासह सर्व खाती चालवण्यासाठी अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद करते आणि त्यातून सरकारी खाती पोसली जातात, असे असताना त्या खात्यातील अधिकाऱ्यांनी जनतेची नियमांनुसार सेवा केली पाहिजे, पण जेव्हा या खात्यांमध्ये अनागोंदी माजते आणि भ्रष्टाचार बोफाळतो तेव्हा जनतेला उचित सेवा मिळेनाशी होते.

आता तर बहुतेक ठिकाणी हे सरकारी अधिकारीच जनतेची सेवा ठप्प करून टाकतात. परिणामी आपत्ती कामे करून घेण्यासाठी जनतेला सरकारी अधिकाऱ्यांचे हात ओले करावे लागतात. पैसा अडवा आणि पैसा जिरवा, हाच अनेक सरकारी अधिकाऱ्यांचा खाक्या असतो. नडलेली जनता मग नाक मुठीत घेऊन भ्रष्ट अधिकाऱ्यांना शरण जाते. म्हणजे सरकार चालवण्यासाठी आधी कर भरायचा, मग लाच द्यायची आणि त्यानंतर बिले भरायची. हा सारा जुलमी कारभार झाला, गुन्हेगारांकडून कोणत्याही व्यक्तीच्या जीवाला धोका असेल, तर त्यांची सुरक्षा सुनिश्चित करणे हे पोलिसांचे कर्तव्य आहे आणि सुरक्षेच्या नावाखाली लाखोंचे बिल दिले जाऊ नये. पोलीस प्रशासनातील उच्च अधिकाऱ्यांनी अशा प्रकरणांची स्वतःहून दखल घेणे आवश्यक आहे. शेवटी, सरकार प्रामाणिकपणे कर भरणाऱ्यांना काही विशेष सुविधा का देत नाही? किमान सरकारने त्या व्यावसायिकांच्या सुरक्षेची हमी तर दिलीच पाहिजे, जे गुंड किंवा गुन्हेगारांच्या नजरेत आहेत आणि ज्यांना खंडणीच्या धमक्या मिळत आहेत, त्यांना सुरक्षा पुरवणे हे शासनाचेच काम आहे, कर वसुलीबरोबरच इतर अनेक महत्त्वाची कामे सरकार करत असले, तरी सुरक्षा हेही यातील एक महत्त्वाचे काम आहे. सरकारने प्रत्येकच नागरिकाच्या सुरक्षेची काळजी घेतली पाहिजे, त्यात भेदभाव असता कामा नये. करदात्यांकडून कर वसूल करतानाच त्यांच्याबद्दल संवेदनशीलही असले पाहिजे.

# नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयाच्या समीक्षा पंडीतचे वक्तृत्व स्पर्धेत सुयश




ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील समीक्षा पंडीतने गोंडवाना विद्यापीठस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटाकावला असून सदर स्पर्धा यादवराव पोशट्टीवार महाविद्यालय, तळोधी (बा.) येथे ‘आजचा युवक व समाजमाध्यमांचा प्रभाव’ या विषयावर नुकतीच पार पडली.

सदर स्पर्धेचे उद्‌घाटन प्राचार्य डॉ. अमृत लंजेंनी केले. यावेळी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. पी. अरुण प्रकाश तर परिक्षक म्हणून डॉ. धनराज खानोरकर, डॉ. विकास मोहतुरे, संतोष नन्नावार तर संयोजक डॉ. संजय चव्हाण, प्रा. उपेंद्र चिटमलवार उपस्थित होते. या स्पर्धेत २५ स्पर्धेकांनी आपला सहभाग नोंदविला. विजेत्या तीन स्पर्धेकांना रोख रक्कम, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. सहभागींना प्रमाणपत्र देण्यात आले.

समीक्षा पंडीतचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.एच. गहाणे, उपप्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर, प्रभारी डॉ. पद्माकर वानखडे व इतर कर्मचारी यांनी भरभरुन अभिनंदन केले.

# कोतवाल संघटनेचा राज्यस्तरीय आंदोलनाला पाठिंबा

## चतुर्थ श्रेणीच्या मागणीकरीता मुंबईत बेमुदत आंदोलन

ब्रम्हपुरी/का.प्र.

महसूल विभागामध्ये कार्यरत असलेल्या कोतवालांना चतुर्थ श्रेणीचा दर्जा देऊन चतुर्थ




वेतनश्रेणी देण्यात यावी या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य महसूल सेवक संघटनेच्या वतीने गुरुवारपासून मुंबईच्या आझाद मैदानावर बेमुदत कामबंद आणि धरणे आंदोलन सुरू आहे. या बेमुदत आंदोलनाला पाठिंबा देत ब्रम्हपुरी तालुक्यातील कोतवाल सहभागी झाल्याने महसूल विभागातील अनेक काम ठप्प झाली आहेत.

राज्यातील महसूल सेवक (कोतवाल) यांची गेली गेल्या चाळीस वर्षापासून चतुर्थ श्रेणीची मागणी अजून पर्यंत शासनाने पूर्ण केलेली नाही. चतुर्थश्रेणीची मागणी पूर्ण न करता याउलट सन २००६ पासून दहा टक्के मानधनवाढ लागू केल्याने राज्यातील महसूल सेवकांवर अन्याय झाला आहे. सध्या सुरु असलेल्या अर्थसंकल्पामध्ये कोतवालांना चतुर्थ श्रेणी वेतनश्रेणी मंजूर व्हावी, यासाठी राज्यभरातून महसूल सेवक (कोतवाल) संघटनेच्या वतीने शासनाला निवेदन दिले होते.

१९ मार्चपर्यंत कोतवाल संघटनेच्या मागण्या मान्य न केल्याने दिनांक २० मार्चपासून राज्यातील सर्व महसूल सेवक (कोतवाल) आझाद मैदान, मुंबई येथे बेमुदत कामबंद आंदोलन व धरणे आंदोलनाला बसले आहेत. या आंदोलनात ब्रम्हपुरी तालुक्यातील कोतवाल सहभागी झाल्याने महसूल विभागातील गावपातळीवरील अनेक कामे ठप्प पडली आहेत.

## विनोदिनी

सिनेमाच्या इंटर्व्हल नंतर अंधारात आपल्या सीटवर परत जात असलेल्या जोशी काकूंनी सुरुवातीच्या सीटवर बसलेल्याला इसमाला आस्थेने विचारले,
’काय हो..!
मी बाहेर जाताना माझा पाय कोणाच्या तरी पायावर पडल्याने जे कळवळले...
ते तुम्हीच का?’
रागाने लालबुंद झालेला तो :-
’हो.. मग काय....
आत्ता सॉरी म्हणणार आहात का?
जोशी काकू :- ’सॉरी..? नाही हो.. त्यात काय सॉरी म्हणायचंय... (मागे वळून पाहत नवऱ्याला) या हो....बरोबर आहे, हीच लाईन आहे...!


## दुकानाचे गाडे विकणे आहे

सिनेमा टॉकीज चौक, मार्केट रोड,
डॉ. आघाडे यांच्या दवाखान्याजवळ, नागभीड

संपर्क : 9764026807, 7972683511

नियमित वाचा... अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार

# गुरुदेव भक्तांच्या धडक मोर्चानंतर समाज मंदिर बांधकामाला सुरुवात



ब्रम्हपुरी/का.प्र.

गुरुदेव सेवा मंडळाला दान केलेल्या जागेवरील खासदार निधीतून प्रार्थना करण्याकरिता समाज भवनाचे कामाकरीता निधी प्राप्त झाले. मात्र बाहेर गावातील व्यक्तीने त्या जागेवर आपले अधिकार दाखवून बांधकाम थांबविले. त्यामुळे गुरुदेव भक्तांच्या भावना दुखावल्या अर्धवट समाज भवनाचे बांधकाम पूर्ण व्हावे व अडथळा निर्माण करणाऱ्या व्यक्तीवर कायदेशीर कारवाई करावे, या मागणीसाठी हळदा येथील गुरुदेव भक्तांनी तहसील कार्यालयावर व पोलीस स्टेशनवर धडक मोर्चा काढून मागण्यांचे निवेदन तहसीलदार व पोलीस निरीक्षक ब्रम्हपुरी यांना दिले.

त्यानंतर तब्बल साडेतीन महिन्यापासून बंद असलेले समाज मंदिराचे बांधकाम, ब्रम्हपूरी विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार प्रा.अतुल देशकर यांनी तहसीलदार सतीश मासाळ यांच्याशी संवाद साधत यशस्वी तोडगा काढल्याबद्दल आणि विना विलंब बांधकामाला सुरुवात झाल्याबद्दल श्री गुरुदेव सेवा मंडळाचे कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी यांनी तहसीलदार व प्रा. देशकर यांचे आभार मानले.

ब्रम्हपुरी तालुक्यातील हळदा येथे अनेक वर्षापासून गुरुदेव सेवा मंडळ असून किमान ५० ते ६० गुरुदेव सेवक परिवार आहेत. ते सर्व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारसरणीशी प्रेरित होऊन दररोज सकाळ सायंकाळ प्रार्थना करतात. त्याच बरोबर अनेक सामाजिक उपक्रम राबवित असतात. याच कार्याने प्रेरित होऊन गावातील प्रमोद राऊत, सुदाम राऊत यांनी आई वडिलांच्या स्मुर्ती निमित्त ४० बाय ३० एकूण १२०० चौ. मीटर जागा गुरुदेव सेवा मंडळास दान दिली. ती जागा ग्रामपंचायत नी गुरुदेव सेवा मंडळाच्या नावे केली आहे. त्याच जागेवर माजी खासदार महोदय यांच्या स्थानिक निधीतून दहा लक्ष रुपयाचा निधी समाज भवना करिता मंजूर झाला व समाज भवनाचे बांधकाम ग्रामपंचायत मार्फत सुरू होते. मात्र प्रभाकर पांडुरंग धुडसे राह. पालेबारसा ता.सावली या बाहेर गावातील व्यक्तीने बांधकाम विभागास अर्ज करून सदर बांधकाम बंद पाडले. बांधकाम विभागाने कोणतीही चौकशी न करता सदर बांधकाम बंद करण्याचे पत्र दिले. बंद पडलेले काम सुरू करावे यासाठी अनेक वेळा तहसील कार्यालय, बांधकाम विभाग यांना विनंती अर्ज केले, मात्र त्यांनी लक्ष दिले नाही. त्यामुळे २० मार्च २०२५ ला बंद पडलेले काम सुरू करावे या मागणीसाठी रेल्वे फाटक ते तहसील कार्यालय, व पोलीस स्टेशन पायी गुरुदेव भक्तांनी दिंडी भजन काढीत तहसील कार्यालयावर मोर्चाची धडक दिली व आपल्या मागण्यांचे निवेदन नायब तहसीलदार यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले होते.

बांधकाम सुरू करते वेळी माजी सभापती तथा तालुका महामंत्री प्रा.रामलाल महादेव दोनाडकर, सरपंच दौलत गरमडे, भाजपा कार्यकर्ता शंकर आष्टेकर, श्री गुरुदेव सेवा मंडळाचे पदाधिकारा उपस्थित होते.

# लोकराजे शिवरायांचा शिवधर्म हा लोकहितासाठीच

## शिवजयंती उत्सवः डॉ धनराज खानोरकर यांचे प्रतिपादन



ब्रम्हपुरी/का.प्र.

'छत्रपती शिवाजीराजे हे खरे रयतेचे राजे होते. त्यांनी स्वतंत्र राज्य आपल्या बळावर निर्माण केले. ते रयतेतील प्रत्येक घटकांची नितांत काळजी घेत असत. हा राजा आपले मनातले करतो आहे, असे साऱ्या रयतेला वाटे. याच कारणाने रयत त्यांच्यासाठी प्राणाचे बलिदान द्यायला तयार होती कारण लोकराजे शिवरायांचा शिवधर्म हा लोकहितासाठीचा होता' असे मार्मिक विवेचन कवी डॉ. धनराज खानोरकरांनी केले. ते शिवाजी जयंतीनिमित्त अऱ्हेर नवरगावात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

विचारपिठावर उद्घाटक म्हणून कृष्णा सहारे तर अध्यक्ष म्हणून विलास उरकुडे उपस्थित होते. यावेळी मोंटू पिलारे, डॉ. मोहन कापगते, लेखक अशोक पवारांनी मार्गदर्शन केले. प्रा.संजय मगरांनी शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी प्रबोधन विचार मांडले. बक्षिस वितरक म्हणून ॲड. हेमंत उरकुडे उपस्थित होते. जितेंद्र कऱ्हाडे, सतीश ठेंगरे, सुभाष ठेंगरे, ऋषी ठेंगरे, वैशाली लोखंडे इत्यादी मान्यवर मंचावर उपस्थित होते. पाहूण्यांच्या हस्ते सोमेश्वर खरकाटे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. याशिवाय स्पर्धेतील विजयींना गौरविण्यात आले. सप्तखंजेरीवादक पंकज पाल महाराजांचा प्रबोधन कार्यक्रम रात्री पार पडला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कवी अमरदीप लोखंडे यांनी, संचालन विनित ठेंगरी व आभार प्रदर्शन वामन मिसार यांनी केले. यशस्वीतेसाठी संजू ढोरे, मुन्ना टेंभुरकर व शिवजयंती उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

# न.प.च्या सिंगल युज प्लास्टिक जप्ती कारवाईत २० हजारांचा दंड वसूल

ब्रम्हपुरी/का.प्र.

राज्यात ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीचे प्लास्टीक पिशवी वापरणे, हाताळणे, साठवणुक, निर्यात करणेवर पुर्णतः बंदी करण्यात आलेली आहे. त्यानुसार दिनांक १९ व २० मार्चला प्रशासक तथा मुख्याधिकारी अशिया जुही यांच्या मार्गदर्शनात नगर परिषदच्या पथकामार्फत शहरातील विविध आस्थापना, भाजीपाले विक्रेते, पानठेले ई. ठिकाणी जावुन प्लास्टीक बंदी जप्ती मोहीम राबविण्यात आली.

या मोहीमेत ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीचे एकुण २४ किलो प्लास्टीक जप्ती करुन २०,६०० रूपये इतका दंड व्यवसायीकांकडून वसूल करण्यात आला. या मोहीमेत पा.पु.व स्वच्छता अभियंता मोहित ढोकणे, स्वच्छता निरीक्षक नितिश रगडे, शहर समन्वक प्रविण काळे, तनवीर खान पठान, जालिंदर ठेंगरे, मुकेश राऊत, पवन दिवटे, आशिष मालोदे, जॉन एक्का व पवन रामटेके सहभागी होते.

याबाबत शहरातील सर्व व्यवसायिक, आस्थापना, भाजीपाले विक्रेते, पानठेले यांना ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीची प्लास्टिक पिशवी वापरण्यात येवु नये तसेच नागरीकांनी बाजारपेठेत जातांना कापडी पिशवीचा वापर करावा असे आवाहन प्रशासक तथा मुख्याधिकारी अशिया जुही यांनी केले आहे.

# महाड सत्याग्रह सामाजिक न्यायासाठीचा क्रांतीकारी एल्गार

**- प्राचार्य डॉ. देवेश कांबळे**

ब्रम्हपुरी/का.प्र.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाडच्या चवदार तळ्याचे पाणी पिऊन केवळ दलितांच्या हक्काची लढाई लढली असे नाही, तर संपूर्ण समाजाच्या समतेसाठीचा निर्णायक संदेश दिला. हा सत्याग्रह केवळ इतिहासातील एक घटना नसून, आजच्या समाजासाठीही प्रेरणादायी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखविलेल्या समतेच्या आणि धम्माच्या मार्गावर आपण चालतो आहोत का? याचा विचार करण्याची वेळ आली आहे, असे परखड मत महाड सत्याग्रह दिनाच्या निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स, ब्रम्हपूरी येथे आयोजित मार्गदर्शनपर कार्यक्रमात आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. देवेश कांबळे यांनी केले.




कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख डॉ. रुपेश मेश्राम यांनी महाड सत्याग्रहाच्या ऐतिहासिक आणि सामाजिक परिणामांवर सखोल विवेचन करताना महाड सत्याग्रह हा फक्त एका तळ्यातील पाण्यासाठी नव्हता तर हा लढा दलितांच्या मूलभूत हक्कांसाठी, स्वाभिमानासाठी आणि माणूस म्हणून त्यांना मिळणाऱ्या सन्मानासाठी होता असे विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे संचालन आणि आभार प्रदर्शन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. तुफान अवताडे यांनी केले.

# नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात एनसीसी 'बी' सर्टिफिकेट परीक्षा संपन्न



ब्रह्मपुरी/का.प्र.

नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रह्मपुरी येथे दि. १५ आणि १६ मार्च रोजी एनसीसी 'बी' सर्टिफिकेट परीक्षा यशस्वीरीत्या पार पडली. एनसीसीच्या द्वितीय वर्षातील कैडेट्ससाठी ही परीक्षा अत्यंत महत्त्वपूर्ण असते. ही दोन दिवसीय परीक्षा १५ मार्च रोजी प्रायोगिक आणि १६ मार्च रोजी लेखी स्वरूपात घेण्यात आली. प्रायोगिक परीक्षेत फिल्ड क्राफ्ट आणि बॅटल क्राफ्ट, कम्युनिकेशन, नकाशा वाचन (मॅप रीडिंग), शस्त्र प्रशिक्षण (वेपन ट्रेनिंग स्कील) आणि ड्रिल टेस्ट या विषयांवर मूल्यमापन करण्यात आले.

या परीक्षेसाठी नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज, ब्रह्मपुरी येथील एकूण १०७ कैडेट्स उपस्थित होते. परीक्षेचे नेतृत्व कर्नल समिक घोष (कमांडिंग ऑफिसर, वर्धा) आणि लेफ्टनंट कर्नल अभिनव शर्मा (कमांडिंग ऑफिसर, नागपूर) यांनी केले. तसेच लेफ्टनंट अभिजीत परकरवार, कॅप्टन कुलजीत शर्मा, लेफ्टनंट सरोज शिंगाडे, केअरटेकर ऑफिसर रेवनदास बोरकर, नायब सुभेदार जसविंदर सिंग, नायब सुभेदार विजय कुमार, हवालदार मुकेश, हवलदार कुलजीत सिंग, हवलदार रिंकू सिंग आणि हवलदार पाटिल आणि इतर स्टाफ परीक्षेसाठी उपस्थित होते.

ही परीक्षा कैडेट्ससाठी शिस्त, नेतृत्व आणि सामरिक कौशल्ये विकसित करण्याची उत्तम संधी होती. परीक्षेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल सहभागी सर्व अधिकाऱ्यांचे आणि कैडेट्सचे अभिनंदन करण्यात आले.

# भगतसिंग, सुखदेव, राजगुरू स्मृतीदिनी अभिवादन कार्यक्रम

ब्रह्मपुरी/का.प्र.

शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या स्मृतिदिनानिमित्त ब्रह्मपुरी शहरात



असलेल्या पेठवार्ड येथील भगतसिंग यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन सामाजिक संघटनांच्या वतीने करण्यात आले होते.

यावेळी विविध मान्यवरांनी उपस्थित राहून महान क्रांतीकारकांना श्रद्धांजली अर्पण केली. सामाजिक कार्यकर्ते विहार मेश्राम, भीम आर्मी तालुका अध्यक्ष प्रभू लोखंडे, भीम आर्मी तालुका महासचिव नागेश चहांदे, लक्ष्मी फिजिकल अकॅडमीचे संचालक प्रफुल नागापुरे, अमित रामटेके, ललित धोंगडे तसेच अनेक नागरिक आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान, भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या बलिदानाचे स्मरण करत त्यांच्या विचारांवर चर्चा करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी क्रांतीकारकांचा संघर्ष आणि आजच्या तरुणांनी त्यांच्या विचारांवर चालत समाज आणि देशासाठी योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात आले. उपस्थितांनी मोठ्या उत्साहाने 'शहीद भगतसिंग अमर रहे', 'सुखदेव-राजगुरू अमर रहे' अशा घोषणा देत आपल्या भावना व्यक्त केल्या.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यस्मरण सोहळा

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील खंडाळा येथील जि.प. प्राथमिक शाळेच्या पटांगणावर खंडाळा



ग्रामवासियांच्या उपस्थितीत वंदनिय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यस्मरणाचा कार्यक्रम नुकताच पार पडला.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष व मार्गदर्शक म्हणुन अड्याळ टेकडी येथील सुबोधदादा तसेच प्रमुख अतिथी म्हणुन डॉ. रामेश्वर राखडे, नवलाजी मुळे, पत्रकार लेकराम डेंगे, श्रीराम वाघधरे महाराज, माणिक राखडे, भाष्कर वाघधरे महाराज यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या निमित्याने खंडाळा गावामधिल गुरुदेव भक्तांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची विविध भजने सादर केली. सायंकाळी सामुदायिक प्रार्थना घेवुन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष व मार्गदर्शक सुबोधदादा यांनी सामुदायिक प्रार्थनेचे महत्व समजावुन सांगितले व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन आयोजक, कवी, लेखक पांडुरंग डेंगे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मंगेश तलमले, बंडु डेंगे, रवी हरडे, दिलिप शेंडे यांनी परीश्रम घेतले.

# वैकुंठ टेंभुर्णे, फाल्गुन मेश्राम यांचा सेवानिवृत्ती सत्कार

ब्रम्हपुरी/का.प्र.

तोरगाव केंद्राअंतर्गत बेलगाव जाणी येथील उपक्रमशील शिक्षक वैकुंठ टेंभुर्णे व तोरगाव येथील संयमी शिक्षक फाल्गुन मेश्राम व नान्होरी येथील पुरुषोत्तम नागमोती यांच्या सेवानिवृत्ती निमित्त त्यांचा भावपूर्ण सत्कार व निरोप समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन तोरगाव केंद्रातील सर्व शिक्षक यांच्या वतीने करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विष्णूजी रुईकर, प्रमुख अतिथी म्हणून लिंकेश्वर अवसरे, रामटेके, पोलीस पाटील, तंटामुक्त अध्यक्ष, स्थानिक शाळेचे मुख्याध्यापक गंगाधर मडावी, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, ग्रामपंचायत सदस्य, तसेच शिक्षण क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी मुरलीधर खोब्रागडे, सचिन परशुरामकर, मंगाम मॅडम यांनी सेवानिवृत्त शिक्षकांना शुभेच्छा देत त्यांच्याबद्दलच्या आठवणी व्यक्त केल्या. शिक्षक म्हणून त्यांनी विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत दिलेल्या योगदानाची प्रशंसा सर्वांनी केली. प्रसंगी सत्कारमुर्तीना ड्रेस, शाल-श्रीफळ आणि भेटवस्तू व साळी देऊन त्यांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला. भाविक सुखदेवे यांनी गीत व भाषणांच्या माध्यमातून आपल्या शिक्षकावरील प्रेम व्यक्त केले.

**जल है तो कल है...**

# सरस्वती तर्वेकर महिला महाविद्यालयातील विद्यार्थीनींचे सुयश

नागभीड/प्रतिनिधी

आदर्श कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय देसाईगंज येथे राज्यस्तरीय डुएट डान्स कॉम्पिटिशन स्पर्धेमध्ये सरस्वती जैरामजी तर्वेकर महिला महाविद्यालय नागभीडच्या विद्यार्थिनी संजना मुळे व मुन्नी दिघोरे या विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला होता तेथील त्यांच्या उत्कृष्ट प्रदर्शनाबद्दल त्यांना प्रोत्साहन पर बक्षीस देण्यात आले. त्यांना सन्मान म्हणून प्रशस्तीपत्रक व गुलदस्ता देऊन सन्मानित करण्यात आले.

तसेच यादवराव पोशट्टीवार कला व विज्ञान महाविद्यालय तळोधी बाळापुर येथे झालेल्या गोंडवाना विद्यापीठ स्तरीय वक्तृत्व स्पर्धेच्या आयोजनात महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी पूजा वीर व विशाखा ठाकरे या विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेमध्ये त्यांना तृतीय पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. त्यांना रोख १००१ रुपये, प्रशस्तीपत्र, सन्मान चिन्ह बहाल करण्यात आले.

विद्यार्थीनींनी मिळविलेल्या यशाबद्दल समिधा सेवा संस्थेचे अध्यक्ष गणेश तर्वेकर, सचिव अजय काबरा, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रेखा जीभकाटे यांचेसह प्राध्यापक व कर्मचारी वृंदानी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# विद्यार्थ्यांना वनभ्रमंती करवून जागतिक वन दिन साजरा

## नागभीड येथील सामाजिक वनीकरण परिक्षेत्राचा उपक्रम



नागभीड/प्रतिनिधी

विद्यार्थ्यांना वनभ्रमंती करवून व जंगली प्राणी तसेच विविध पक्षांविषयी माहिती देऊन नागभीड येथील सामाजिक वनीकरण परिक्षेत्र कार्यालय व एकारा (भुज) आश्रम शाळा यांच्या संयुक्त विघमाने शुक्रवारला एकारा येथिल वनविश्रामगृहाच्या परिसरात जागतीक वनदिन साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष नागभीडचे सामाजिक वन परिक्षेत्र अधिकारी ए. व्हि. सोनडवले, ब्रम्हपुरीचे दक्षिण वनपरिक्षेत्र अधिकारी राम शेंडे, वनरक्षक कल्याणी रणदिवे, साहाय्यक शिक्षक नरेश चौधरी, विशेष तज्ञ ललित उरकुडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी परीसरातील पर्यावरण सबंधी माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. त्यानंतर तलाव सभोवताल वनभ्रमंतीसाठी विद्यार्थ्यांना पायदळ फिरवून पक्षांचा आकारमान, आवाजावरुन पक्षांची ओळख, प्राण्यांच्या पाऊल खुनावरुन प्राण्यांची ओळख, वृक्षांची ओळख, वृक्षांचे महत्व व फायदे तसेच पाण्याचे महत्व, वन ओषधी, वृक्ष तोड, वनवा, मानव व वन्यजीव यांच्या मध्ये होणारे संघर्ष इत्यादी विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन ए. व्हि. सोनडवले यांनी केले. प्रसंगी विद्यार्थ्यांना काही प्रश्न विचारून अचूक उत्तरे देणाऱ्या दोन विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आले. आभार प्रदर्शन वनरक्षक कल्यानी रणदिवे यांनी केले.

❀❀❀❀❀❀

# डॉ. रविंद्र विखार यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

ब्रम्हपुरी/का.प्र.

श्री गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालयाचे सहा. प्राध्यापक डॉ. रवींद्र विठोबा विखार यांच्या 'वैज्ञानिक



दृष्टिकोनातून चिकित्सक अभ्यास' या पुस्तकाचे प्रकाशन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे प्र -कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे सर, अधिष्ठाता डॉ. विना चिमोटे, मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ.लक्ष्मण साळोक, सुप्रसिद्ध विचारवंत व समाजशास्त्रज्ञ डॉ.सुरेश वाघमारे, विदर्भ मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. बि.एम.कराडे, गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.बि. एच.किर्दक ,रातुम विद्यापीठाचे समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. प्रदीप मेश्राम, डॉ. के.बि.नायक, डॉ.किशोर राऊत यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.

डॉ. रवींद्र विखार यांची सात पुस्तके प्रकाशित झाले असून बि.ए. प्रथम वर्षाला 'समाजशास्त्र परिचय' या पुस्तकाचा गोंडवाना विद्यापीठाच्या समाजशास्त्र विषयाच्या अभ्यासक्रमात संदर्भ ग्रंथ म्हणून समावेश करण्यात आलेला आहे. सामान्य संशोधन पद्धती भाग एक व भाग दोन क्रमिक पुस्तक म्हणून गोंडवाना विद्यापीठाच्या बीए अंतिम वर्षाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आलेले आहेत. डॉ. रवींद्र विखार हे महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ बालभारती पुण्याचे सदस्य असून विदर्भ मराठी समाज समाजशास्त्र परिषदेचे सचिव म्हणून कार्यरत आहेत .त्यांची ६० हून अधिक संशोधन पेपर राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकेत प्रकाशित करण्यात आलेले आहेत.

❀❀❀❀❀❀

# खेड केंद्राची शिक्षण परिषद कहाली शाळेत संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

पंचायत समिती ब्रम्हपुरी अंतर्गत खेड केंद्राची शिक्षण परिषद दिनांक २१ मार्चला जि.प.उच्च प्राथमिक शाळा कहाली येथे संपन्न झाली. यावेळी मयुर लाडे गटशिक्षणाधिकारी, सुधीर अलोने मुख्याध्यापक खंडाळा, रविंद्र मेश्राम विषय शिक्षक खेड, संदिप पडोळे गटसाधन व्यक्ती यांची उपस्थिती होती.

सर्वप्रथम सावित्रीमाई फुले यांच्या फोटोला दीप प्रज्वलित करून व पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले.त्यानंतर मार्गदर्शक सुधीर अलोने मुख्याध्यापक खंडाळा यांनी उपस्थित शिक्षकाना निपुण भारत कृती कार्यक्रमातील उपक्रमाबाबत व इतर विषयांवर मार्गदर्शन केले. रविंद्र मेश्राम विषय शिक्षक खेड यांनी नवभारत साक्षरता अभियान मूल्यमापन तसेच शाळा मानक पुरावे या विषयावर संवाद साधून मार्गदर्शन केले. मयुर लाडे गटशिक्षणा-धिकारी यांनी निपुण भारत कृती कार्यक्रम, नवभारत साक्षरता अभियान, या विषयांचा आढावा घेऊन योग्य असे मार्गदर्शन केले. संचालन व आभार प्रदर्शन अल्का भुते शिक्षिका कहाली यानी केले.


## रजिस्ट्रेशन ऑफ न्युजपेपर
रूल्स १९५६ अंतर्गत
### अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार
मालकी व अन्य माहिती तक्ता - ४
(नियम ८ पहा)

| | | |
|---|---|---|
| १) वृत्तपत्राचे नांव | : | अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार |
| २) प्रकाशनाचे ठिकाण | : | मु.पो.ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपुर |
| ३) प्रकाशन काळ | : | अर्धसाप्ताहिक |
| ४) मुद्रकाचे नांव | : | राजीव पाचपोर |
| भारताचे नागरिक आहेत काय | : | होय |
| पत्ता | : | मु. मोदी नं. १ सिताबर्डी, नागपूर |
| ५) प्रकाशकाचे नांव | : | अशोक भैया |
| भारताचे नागरिक आहेत काय | : | होय |
| पत्ता | : | मु.ता.पो. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपुर |
| ६) संपादकाचे नांव | : | अशोक भैया |
| भारताचे नागरिक आहेत काय | : | होय |
| पत्ता | : | मु.ता.पो. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपुर |
| ७) वृत्तपत्र मालकाचे नांव | : | अशोक भैया |
| भारताचे नागरिक आहेत काय | : | होय |
| पत्ता | : | मु.पो.ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपुर |

**मी अशोक भैया असे जाहीर करतो की, माझ्या माहितीप्रमाणे वरील तपशिल पुर्णपणे खरा आहे.**

स्वाक्षरी
**अशोक भैया**
प्रकाशक/मालक/संपादक

दि. २०/०३/२०२५



आता लवकरच आमचा ई-पेपर येणार...
थोड्याच अवधीनंतर
ब्रम्हपुरी समाचारचा E-Paper
प्रकाशित करण्यात येईल. याची वाचकांनी नोंद घ्यावी.



आजच अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचारचे वार्षिक वर्गणीदार व्हा...
: कार्यालय पत्ता : गाडगे बाबा स्मारकासमोर, विद्यानगर, ब्रम्हपुरी
: जाहिरातींसाठी संपर्क : महेश पिलारे मो. ९५०३७००९६४
प्रा. विजय मुडे सर मो. ८२७५७७५३७५


**... QUOTES ...**

"I want freedom for the full expression of my personality."

- Mahatma Gandhi

**चारोळी**

बायको खुश राहावी नेहमी म्हणून
तो न केलेल्या चुकाही कबूल करतो...
पुढे पुढे दोघांनाही तशी सवय लागते,
तिला मूल होतं; हा बाप झाल्याचे कबूल करतो...

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

# एलएमबी पब्लिक स्कुलमध्ये Graduation Day उत्साहात संपन्न




ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील एल.एम.बी. पब्लिक स्कुलमध्ये पदवी प्रदान Graduation Day कार्यक्रम मोठया उत्साहात पार पडला. या वेळी सिनिअर केजीच्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथींमध्ये नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया सर, स्कुलच्या संचालिका आशिता भैया मॅडम, मुख्याध्यापक कादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका, पर्यवेक्षिका मॅडम उपस्थित होत्या. प्रसंगी सर्व विद्यार्थी पदवी स्विकारण्यासाठी निळया लाल रंगाचा कोट व टोपी परिधान करून आले होते. दरम्यान, सिनिअर केजीच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी संगीत व नृत्य सादर केले. यावेळी सिनिअर केजीच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, प्रगती पुस्तक देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. सिनिअर केजीतील नैनसी ढवळे हिने नर्सरी ते सिनिअर केजीचा प्रवासाची माहिती दिली. नैनसी ढवळे हिने खूप उत्कृष्ट भाषण दिल्याबद्दल शाळेचे अध्यक्ष अशोकजी भैया सरांनी तिचे पुष्पगुच्छ देऊन कौतुक केले. प्रसंगी अशोकजी भैया सरांनी केजीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

अशा प्रकारे एलएमबी स्कुलमध्ये Graduation Ceremony पार पडली. सर्व LMBPS च्या शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम पार पडला.

# तब्बल २५ वर्षांनी रंगला आठवणींचा स्नेहमिलन सोहळा

## एकत्र येत दिले एकमेकांना मदतीचे आश्वासन

ब्रम्हपुरी/का.प्र.


डॉ बाबासाहेब आंबेडकर विद्यालय ब्रम्हपुरी येथे सन १९९९-२००० च्या १० वी बॅचने तब्बल २५ वर्षानंतर आपल्या शिकत असतानाच्या पुर्वीच्या आठवणींना उजाळा देणारा मैत्रीचा स्नेहमिलन सोहळा पार पाडुन एक आदर्श निर्माण केला.

ब्रम्हपुरी पासुन ३ किमी अंतरावर असलेल्या दुधवाही येथील निसर्गरम्य वातावरणातील फार्म हाऊस वर हे आयोजन करण्यात आले. २५ वर्षा पुर्वीच्या १० वी तील आठवणींना उजाळा




देण्यासाठी सुरुवातीला व्हाट्सअप ग्रुप बनविण्यात येऊन सर्व क्लासमेट्स यांना एकसंघ बांधण्यात आले व त्यानुसार सर्व नियोजन आखण्यात आले.

स्नेहमिलन सोहळयाच्या यशस्वीतेसाठी केशिप पाटील व लिलाधर वंजारी यांनी मोलाची कामगिरी बजावली आहे तसेच आशिष नागदेवते, अमोल बागडे, राकेश फुलझेले, वैशाली ठवरे, सुभाष बनकर, नरेश लोखंडे यांनी मोलाचे सहकार्य केले.शिवाय शरद बोरकर, सरोज मेंढे, गिरीधर गणवीर, प्रतिपाल हुमणे, चोखेश्वर रामटेके, राजेश लोणारे, धनपाल शेंडे, रविकांत राऊत, कैलास ढोक, भाग्यवंत लोणारे, क्रिष्णा वैद्य,विकास सांगोळकर, भागवत पचारे, सुरेश कोराम, शिल्पा बागडे, अर्चना मेश्राम, शुभांगी मेश्राम, दिक्षा रामटेके, रुपाली सैजारे, प्रमिला लोखंडे, सुजाता रामटेके, मुनेश्वर देवगडे, कृष्णकांत भागडकर, रजनीकांत कांबळे, रॉकेश कुरझेकर, सुरज रामटेके, मुन्ना बोरकर, धम्मा बनकर, राजेश रामटेके, राष्ट्रपाल मेश्राम आदिंनी सहभाग घेऊन स्नेहमिलन सोहळा पार पाडला.

Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

सोरते
प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
स्टेनलेस स्टील वर्क्स
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.



- फार्मसिस्ट पाहिजेत -
अनुभवी किंवा अनुभव नसलेलाही चालेल...
इच्छुकांनी खालील क्रमांकावर संपर्क करावे.
संपर्क : 7888019945


# इतर राज्यांपेक्षा महाराष्ट्रात तिप्पट...

(पान क्र. १ वरून)

आयुक्त परिवहन विभाग

**परिवहन जाचक कारभार -**

०१ एप्रिल २०१९ पूर्वीच्या सुमारे ०२ कोटी १० लाख वाहनांना एचएसआरपी नंबर प्लेट लावण्यासाठी ३० जूनपर्यंत मुदतवाढ. एचएसआरपी नंबर प्लेट बसविली नाही तर त्या वाहनांचे आरटीओतील इतर काम होणार नाही. वाहनांचे सर्व अभिलेख ऑनलाईन व डिजी लॉकरवर असतात. वाहनधारकांकडून सर्व कागदपत्रे व मूळ आरसी बुक सादर करण्याची अट. नंबर प्लेट बूक केल्यानंतर ९० दिवसांत लावली गेली नाही तर वाहनधारकाने भरलेले पैसे परत भरण्याची तरतूद नाही.

# केंद्र सरकार 'एकच नोकरी अर्ज पोर्टल'च्या तयारीत

ब्रम्हपुरी/का.प्र.

केंद्र सरकार युवकांसाठी 'एकच सिंगल जॉब अप्लिकेशन पोर्टल' तयार करण्याच्या विचारात आहे. त्यामुळे विविध प्लॅटफॉर्मवर नोकरीसाठी अर्ज करण्याच्या तरूणांच्या कटकटी वाचतील.

मनुष्यबळ आणि प्रशिक्षण विभागाचे केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी नुकतेच या पोर्टलच्या निर्मितीचे निर्देश दिले. डॉ. सिंह यांनी आढावा बैठकीत भरती प्रक्रियेतील प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. त्यांनी नमुद केले की २०१४ पूर्वी हिंदी आणि इंग्रजीपुरती मर्यादित असलेली भरती परिक्षा आता १३ प्रादेशिक भाषांमध्ये घेतली जात आहे. भरती प्रक्रियेचा कालावधी १५ महिन्यांवरून ०८ महिन्यांपर्यंत कमी झाला आहे. हा कालावधी आणखी कमी करण्याच्या दिशेने प्रयत्न सुरू आहेत.


Lubi PUMPS-MOTORS
बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404